# डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष हिवाळी शिबीर अहवाल

दिनांक:- 03/02/2020 ते 09/02/2020

---

### पहिला दिवस:- आगमन

दिनांक:- 03/02/2020

डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबीर दिनांक 03 फेब्रुवारी ते 09 फेब्रुवारी 2020 पर्यंत मु. खडगाव, जिल्हा नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. शिबिरामद्धे 140 विद्यार्थी सहभागी झाले होते. सकाळी 11 वाजता NSS च्या सर्व विद्यार्थांना बसने खडगाव येथे नेण्यात आले होते. शिबिरार्थिंची राहण्याची व्यवस्था खडगाव येथील जि.प. शाळेत करण्यात आली होती. विद्यार्थांनी जि.प. शाळेचा पूर्ण परिसर स्वच्छ करून दुपारी 2 वाजता शिबिरार्थी विद्यार्थांनी जेवण केले. जेवनानंतर सात दिवस लागणाऱ्या जेवणाच्या साहित्यापासून ते डेकोरेशन पर्यंतच्या सर्व साहित्याची जुळवाजुळव केली.

सायंकाळी 5 वाजता सर्व विद्यार्थांना शाळेच्या पटांगणावर एकत्र करण्यात आले होते. कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी सर्व विद्यार्थांना शिबिराचा उद्देश, नियम व अटी समजावून सांगितल्या. आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या टाळीचा सराव घेण्यात आला. त्यानंतर एका वेगळ्याप्रकारे विद्यार्थांचा एक दुसऱ्याशी परिचय करून घेण्यात आला. या शिबिरात महाविद्यालयातील विविध शाखेचे विद्यार्थी सहभागी झाले होते. रात्री 8 वाजता सर्व विद्यार्थांना जेवण देण्यात आले. रात्री 9.30 वाजता विद्यार्थांना विश्रांतीसाठी पाठविण्यात आले.




2020-02-03(Mon) 06:11(PM)


2020-02-03(Mon) 04:47(PM)


2020-02-03(Mon) 05:08(PM)

# दूसरा दिवस:- उद्घाटन

दिनांक:-04/02/2020

दिनचर्येप्रमाणे सकाळी 5 वाजता प्रार्थना, प्राणायम, योगासने घेण्यात आले. सकाळी 8 वाजता शिबिरार्थिंना चहा व नास्ता देण्यात आला होता. दुपारी 12.30 वाजता राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे उद्घाटन समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले होते. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील, प्रमुख अतिथि म्हणून प्रियदर्शिनी शिक्षण महाविद्यालयाचे डॉ. सुभाष खाकसे, सरपंच सुरेखाताई मून, समाजसेवक चंद्रशेखर गणविर, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. भुवनेश्वरी मेहरे मंचावर उपस्थित होते.

उद्घाटणीय कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेला माल्यार्पण, दीप प्रज्वलित करून करण्यात आली. विद्यापीठ गीत व राष्ट्रीय सेवा योजनेच्या गीतानंतर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. आपल्या उद्घाटणीय भाषणातून विद्यार्थांना संबोधित करतांना डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनी "ग्रामीण जीवनाच्या विद्यार्थांनी अभ्यास केला पाहजे. तसेच भारतीय राज्यघटनेचे महत्व या सात दिवसात गावातील लोकांना पटवून संगितले पाहिजे. जेणेकरून प्रत्येक माणसाला आपल्या कर्तव्याची व हक्काची जाणीव होईल. तसेच या शिबिराच्या माध्यमातून संविधान जन-जागृती करा. असे आवाहन त्यांनी विद्यार्थांना केले. डॉ. सुभाष खाकसे यांनी विद्यार्थांच्या जीवनात राष्ट्रीय सेवा योजनेचे किती महत्व आहे. हे विविध प्रसंगाद्वारे व उदाहरनाद्वारे पटवून दिले. सरपंच सुरेखाताई मून यांनी विद्यार्थांना गावात कोणकोणते उपक्रम घ्यावेत हे संगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजाचा कसा विकास करता येईल या करिता प्रयत्नशील असले पाहिजे असे संगितले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. सूत्रसंचालन अंजली गुप्ता तर आभार चेतना गौतम हिने मानले. दुपारी 2 वाजता पाहुण्यांनी व विद्यार्थांनी भोजनाचा आनंद घेतला.

सायंकाळी 6 वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. विद्यार्थांनी विविध सामाजिक घटकांवर व समस्यांवर आपल्या कलागुणांद्वारे प्रबोधन व मनोरंजन केले. या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रात्री 10 वाजता सर्व शिबिरार्थिंनी जेवण केले, व त्यानंतर त्यांना विश्रांतीसाठी पाठविण्यात आले.





प.पू.डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी, नागपूर.
डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना
अंतर्गत
स्वच्छ भारत अभियान व युवा जागृती
विशेष हिवाळी शिबीर
३ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२०


राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छ भारत अभियान व युवा जागृती
विशेष हिवाळी शिबीर
डॉ. आंबेडकर महाविद्या
Khadgaon Rd, Khadgaon, Maharashtra 441501, India
Khadgaon
Maharashtra
India
25°C
77°F
2020-02-04(Tue) 13:05


राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छ भारत अभियान व युवा जागृती
विशेष हिवाळी शिबीर
डॉ. आंबेडकर महाविद्याल


राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छ भारत अभियान व युवा जागृती
विशेष हिवाळी शिबीर
डॉ. आंबेडकर महाविद्याल
Khadgaon Rd, Khadgaon, Maharashtra 441501, India
Khadgaon
Maharashtra
India
25°C
77°F
2020-02-04(Tue) 12:34


राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छ भारत अभियान व युवा जागृती
विशेष हिवाळी शिबीर
डॉ. आंबेडकर महाविद्याल
Khadgaon Rd, Khadgaon, Maharashtra 441501, India
Khadgaon
Maharashtra
India
25°C
77°F
2020-02-04(Tue) 12:52


Khadgaon Rd, Khadgaon, Maharashtra 441501, India
Khadgaon
Maharashtra
India
24°C
75°F
2020-02-04(Tue) 12:22

दिवस:- तिसरा

दिनांक:-05/02/2020

दिनचर्येप्रमाणे सकाळी 5 वाजता प्रार्थना, प्राणायम, योगासने घेण्यात आले. सकाळी 8 वाजता सर्वांना अल्पोहार व चहा देण्यात आला. सकाळी 9 वाजता गावात जनजागृती रॅली काढण्यात आली. विविध सामाजिक उपक्रमातून विद्यार्थांनी रॅलीतून सामाजिक संदेश दिला. पथनाट्यांद्वारे शिक्षणाचे महत्व, हुंडाबळी, स्त्री शिक्षण, बालकामगार शोषण या विषयावर आपल्या अभिनयाच्या माध्यमातून जनजागृती केली व भारतीय संविधानाची भूमिका व महत्व लोकांना पटवून दिले. दुपारचे भोजन आटपून शिबिरार्थी दुपारी 2.30 वाजता व्याख्यान एकण्यासाठी उपस्थित झाले होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर रेवतकर यांनी “Genius is 10% Inspiration 90% perspiration” या विषयावर आणि डॉ. विद्याधर शिवणकर यांनी “राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी जीवनात महत्व” या विषयांवर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन आमिषा शेगावकर तर आभार सरोज भालाधरे याने मानले.

सायंकाळी 6.30 वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली होती. त्यात शेतकऱ्यांची आत्महत्या, कौटुंबिक हिंसाचार व काही मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थांच्या कलागुणांना वाव मिळाली. रात्री शिबिरार्थिंनी भोजन घेतले व रात्री 11 वाजता विश्रांतीकरिता पाठविण्यात आले.




प.पू.डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी, नागपूर.
डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना
अंतर्गत
स्वच्छ भारत अभियान व युवा जागृती
विशेष हिवाळी शिबीर
फेब्रुवारी २०२०
मु. खडगाव, तह. जि. नागपूर
Deekshabhoomi
Government Agriculture College Grounds
2020-02-05(Wed) 01:18(PM)


2020-02-05(Wed) 09:30(AM)


राष्ट्रीय सेवा योजना
2020-02-05(Wed) 09:12(PM)

# दिवसः- चौथा

दिनांक:-06/02/2020

सकाळी 5 वाजता विद्यार्थांनी प्राणायम व योगासने केली. सकाळी 8 वाजता चहा व नास्ता घेतला सकाळी पाऊस असल्यामुळे विद्यार्थांनी भर पावसात गावात जावून श्रमदान केले. झाडे लावली. मंदिर परिसर स्वच्छ केला व गावातील कचरा गोळा केला. 12 वाजता आंघोळ आटपून जेवण घेतले. पाऊस असल्यामुळे व्याख्यानाला डॉ. दीपा पान्हेकर व डॉ. शैलेश बहादुरे येऊ शकले नाही. त्यायेवजी दुपारी 2 वाजता मानवी फाउंडेशनचे गुल्लू बेहरा यांनी मानवी अवयवांवर व अवयवदनावर विद्यार्थांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन आमिषा शेगावकर तर आभार पारधी याने मानले.

दुपारी 4 वाजता सर्वांना चहा व बिस्किटे देण्यात आली. सायंकाळी 6 वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली होती. गावातील लोकांनी विद्यार्थांनी सादर केलेल्या कार्यक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाला सरपंच सुरेखाताई मून, चंद्रशेखर गणविर प्रा. विद्या चौरपगार उपस्थित होते. रात्री 10.30 वाजता जेवण देवून विश्रांतीसाठी पाठविण्यात आले.




Meditrina Institute of Medical Sciences
Government Agriculture College Grounds
Deekshabhoomi
S Ambazari Rd
Google
2020-02-06(Thu) 12:53(PM)


राष्ट्रीय सेवा योजना
Google
2020-02-06(Thu) 08:17(PM)


राष्ट्रीय सेवा योजना

# दिवस:- पाचवा

दिनांक:-07/02/2020

सकाळी 5 वाजता विद्यार्थांनी प्राणायम व योगासने केली. सकाळी 8 वाजता चहा व नास्ता घेतला. सकाळी 9 वाजता विद्यार्थांनी संविधान जनजागृती रॅली काढण्यात आली होती. या रॅलीमध्ये हिंदू-मुस्लिम, शीख-ईसाई अश्या विविध धर्माच्या वेशभूषा विद्यार्थांनी परिधान केल्या होत्या. त्याचबरोबर विविध महापुरुषांची सुद्धा वेषभूषा केली. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाबाई, संत गाडगेबाबा, जिजावू, मदर टेरेसा, वारकरी संप्रदाय तसेच विविध जाती धर्माच्या लोकांना कसे एकसंघ ठेवते व प्रत्येक माणसाला समतेचा अधिकार कससा बहाल करते. याचा परिचय विदयर्थांनी करून दिला. गावातील चौका चौकात भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन विद्यार्थांनी केले. दुपारी 1 वाजता सर्व शिबिरार्थिंना जेवण देण्यात आले. दुपारी 2.30 वाजता प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी “डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य व तरुणांची भूमिका” या विषयावर तसेच डॉ. बळवंत भोयर यांनी “अभिनय क्षेत्रातील विविध संधी” या विषयावर विद्यार्थांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन आयूषी उपाध्येय व आभार आयुष गजभिये याने मानले. सायंकाळी 6 वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. नृत्य, नाटक, एकपात्री प्रयोग रमाईच्या त्यागावर सादर करण्यात आले. 10 वाजता सर्व शिबिरार्थिंना जेवण देण्यात आले व 11 वाजता विश्रांतीसाठी पाठविण्यात आले.




डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना
NSS
2020-02-07(Fri) 10:40(AM)


2020-02-07(Fri) 11:46(AM)






प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी, नागपूर.
डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना
अंतर्गत
Khadgaon Rd, Khadgaon, Maharashtra 441501, India
Khadgaon
Maharashtra
India
20°C
68°F
2020-02-07(Fri) 12:29(PM)


प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी, नागपूर.
डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना
अंतर्गत
स्वच्छ भारत अभियान व युवा जागृती
विशेष हिवाळी शिबीर
३ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२०
Khadgaon Rd, Khadgaon, Maharashtra 441501, India
Khadgaon
Maharashtra
India
20°C
68°F
2020-02-07(Fri) 12:04(PM)

# दिवस:- सहावा

दिनांक:-08/02/2020

दिनचर्येप्रमाणे आपली कामे आटपून शिबिरार्थिंना सकाळी 9 वाजता श्रमदानासाठी गावात पाठविण्यात आले. गावातील स्वच्छता करून विद्यार्थांनी गावकऱ्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून सांगितले. विद्यार्थांना जनप्रतींनिधी बनवून पक्ष व अपक्ष अशा गटात विभाजन करून सामाजिक समतेवर चर्चा करण्यासाठी सांगण्यात आले होते. विद्यार्थांनी योग्य प्रकारे चर्चा केली. त्यांनंतर दुपारी 4 वाजता चहा घेतल्यानंतर उत्कृष्ट वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात विद्यार्थांनी सहभाग घेतला व आपआपली मते मांडली. परीक्षक म्हणून कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी काम पहिले. सायंकाळी 6 वाजता सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. 9 वाजता विद्यार्थांना जेवण देण्यात आले. रात्री 10 वाजता कॅम्प फायर करण्यात आला. या सात दिवसात विद्यार्थांना आलेल्या अनुभवाबद्दल त्यांच्या कडून मनोगत व्यक्त करण्यात आले. रात्री 1 वाजता विद्यार्थांना विश्रांतीसाठी पाठविण्यात आले.





# दिवस:- सातवा समारोप

दिनांक:-09/02/2020

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छ भारत अभियान व युवा जनजागृती या विषयावर आधारित विशेष हिवाळी शिबीराचा समारोप दिनांक 9 फेब्रुवारी 2020 ला खडगाव येथील प्राथमिक शाळेच्या पटांगणावर करण्यात आला. या समारोपिय कार्यक्रमाला प्रमुख अतिथि म्हणून प्रा. सुरेन्द्र मोरे, देवरावजी कडू, प्रा. सुभाष खाकसे, सरपंच सुरेखाताई मून, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर गणविर उपस्थित होते. चेतना गौतम, आयूषी उपाध्ये, निखिल मोटघरे, अमीषा शेगावकर, सरोज भालधारे आदि विद्यार्थांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. सुरेन्द्र मोरे यांनी विद्यार्थांमध्ये सामाजिक जाणिवा निर्माण करण्यासाठी विविध समाजसुधारकांचा आलेख त्यांच्यापुढे ठेवला. सरपंच सुरेखाताई मून यांनी डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या विद्यार्थांचे कौतुक केले व त्यांना भविष्यात उज्वल यश प्राप्त करून घेण्यासाठी शुभेच्छा दिल्या. इतर मान्यवरांनी सुद्धा विद्यार्थांना मार्गदर्शन केले. व पुन्हा आमच्या गावात शिबीर आयोजित करण्याच्या सूचनाही दिल्या. कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी गावातील लोकांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. सूत्रसंचालन अमीषा शेगावकर व आभार निखिल मोटघरे यांनी मानले. दुपारी 2 वाजता सर्वांनी जेवण घेतले व गावकऱ्यांनी शिबिरार्थिंना निरोप दिला. सायंकाळी 6 वाजता महाविद्यालयातून विद्यार्थांना त्यांच्या पालकांसोबत घरी पाठविण्यात आले.




राष्ट्रीय सेवा
स्वच्छ भारत अभियान
शिबीर



# ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवा संविधान!

## डॉ. आंबेडकर कॉलेजच्या रासेयो शिबिराचे उद्घाटन

म. टा. प्रतिनिधी, नागपूर




संविधानाने दिलेल्या अधिकारानेच समाजाच्या विकासाला चालना मिळाली आहे. हे लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण जनतेपर्यंत संविधानाचे महत्त्व पोहोचवावे, असे आवाहन नागपूर विभागाचे प्रादेशिक समाज कल्याण उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनी केले. डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या रासेयो सात दिवसीय शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. वाडीनजीकच्या खडगाव येथे हे सात दिवसांचे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

डॉ. गायकवाड यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य आर. व्ही. पाटील, प्रा. सुभाष खाकसे, उपप्राचार्य डॉ. के. जी. रेवतकर, कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, सरपंच रेखा मून, माजी सरपंच देवराव कडू व्यासपीठावर उपस्थित होते. प्रा. खाकसे यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञानाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कॉलेजचे प्राचार्य प्रा. पाटील यांनीदेखील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रास्ताविकातून डॉ. तिरपुडे यांनी शिबिराचे उद्देश, महत्त्व व स्वरूप याबाबत माहिती दिली. अमिषा शेगावकर यांनी संचालन केले, तर आयुषी उपाध्याय यांनी आभार मानले.

---

तरुण भारत

Apla Nagpur | 2020-02-06 | Page- 2

## विद्यार्थ्यांनी संविधान ग्रामीण जनतेपर्यंत पोचवावे




राष्ट्रीय सेवा योजना ही संघटना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागृती घडवून आदर्श नागरिक निर्माण करण्याचे कार्य करते. या भावी नागरिकांना संविधानाने दिलेल्या अधिकारांची माहिती असणे आवश्यक आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारानेच नागरिकांच्या विकासाला चालना मिळाली आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण जनतेपर्यंत संविधानाचे महत्त्व पोचवावे, असे आवाहन नागपूर विभागाचे प्रादेशिक समाजकल्याण उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनी केले. वाडीनजीकच्या खडगाव येथे दीक्षाभूमीस्थित डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य पाटील, तर विशेष मार्गदर्शक म्हणून प्रा. सुभाष खाकसे, डॉ. के. जी. रेवतकर, डॉ. रवींद्र तिरपुडे, रेखा मून, देवराव कडू आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले. संचालन अमिशा शेगावकर यांनी तर आभार आयुषी उपाध्याय यांनी मानले.

Powered by Bharati Web Pvt Ltd

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे रासेयो शिबिर

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**नागपूर** : राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत सामाजिक जागृती घडवून आदर्श नागरिक निर्माण करण्याचे कार्य करते. या भावी नागरिकांना संविधानाने दिलेल्या अधिकारांची माहिती असणे आवश्यक आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारानेच समाज व नागरिकांच्या विकासाला चालना मिळाली आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन एनएसएसच्या निवासी शिबिरार्थ्यांनी ग्रामीण जनतेपर्यंत संविधानाचे महत्त्व पोहोचवावे, असे प्रतिपादन नागपूर विभागाचे प्रादेशिक समाजकल्याण उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनी वाडी नजीकच्या खडगाव येथे दीक्षाभूमीस्थित डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी केले.

डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील, विशेष मार्गदर्शक म्हणून प्रा. सुभाष खाकसे, उपप्राचार्य डॉ. के. जी. रेवतकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, सरपंच रेखा मून, माजी सरपंच देवराव कडू व्यासपीठावर उपस्थित होते. पुस्तकी ज्ञानासोबतच जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रात्यक्षिक ज्ञानाची गरज असून ती या शिबिरातून प्राप्त होईल व कृतीतून शिक्षण व कौशल्य आत्मसात करून यशस्वी होण्याचे अनुभव प्रा. सुभाष खाकसे यांनी कथन केले. ज्ञानाच्या अनुभवासाठी ग्रामीण क्षेत्राचे अनुभव उपयोगी ठरतील असे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी प्रास्ताविकेतून शिबिराचा उद्देश, महत्त्व विशद केले. संचालन अमीषा शेगावकर यांनी केले. आभार आयुषी उपाध्येय मानले.

नवराष्ट्र

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिला एकात्मतेचा संदेश



**नागपूर.** डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर नागपूर जिल्ह्यातील खडगाव येथे घेण्यात आले होते. या सात दिवसीय शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी गावात जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. याप्रसंगी स्वच्छता अभियान, बेटी बचाव, पाण्याचे महत्त्व, संविधान जनजागृती, शिक्षणाचे महत्त्व अशा विविध विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे रॅली काढून लोकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

सर्वधर्म समभाव रॅली काढून एकात्मतेची भावना लोकांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, गाडगे महाराज, सावित्रीबाई फुले, रमाबाई, वारकरी संप्रदाय, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लीम, हिंदू, संस्कृती या रॅलीच्या माध्यमातून दाखविली व भारत हा विविध जातीने, धर्माने, संस्कृतीने नटलेला देश आहे. या देशाची विविधता आजही जगाला शांतीचा, एकात्मतेचा संदेश देत आहे. यानिमित्ताने कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांच्या नेतृत्वात रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.